Literacy for a Billion

Movie: Hirva Kunku
Year: 2006

Song: Chala ga sakhyano varulala
Lyricist: Neeta Devkar

चला गं सख्यांनो वारूळाला वारूळाला
चला गं सख्यांनो वारूळाला वारूळाला
भुजंगाला पुजायाला पुजायाला
भुजंगाला पुजायाला पुजायाला
चला गं सख्यांनो वारूळाला वारूळाला
चला गं सख्यांनो वारूळाला वारूळाला
भुजंगाला पुजायाला पुजायाला
भुजंगाला पुजायाला पुजायाला

भोळया शंकराच्या गळी
तुझ्यापायीच गारवा
तुझ्या अंगाचं अंथरूण
निज लागे नारायणा
भोळया शंकराच्या गळी
तुझ्या पायीच गारवा
तुझ्या अंगाचं अंथरूण
निज लागे नारायणा
निज लागे नारायणा
बारा घरच्या बारा जणी
फेर धरी तुला
बारा घरच्या बारा जणी
फेर धरी तुला
भुजंगाला पुजायाला पुजायाला
हो भुजंगाला पुजायाला पुजायाला

माझा भुजंग सख्या गं
करी गावाचं रक्षण
दूध लाह्या देऊ त्याला
मग देईल दर्शन
माझा भुजंग सख्या गं
करी गावाचं रक्षण
दूध लाह्या देऊ त्याला
मग देईल दर्शन
मग देईल दर्शन
पाच फण्या उभारूनी
धरीतो धरित्रीला
पाच फण्या उभारूनी
धरीतो धरित्रीला
भुजंगाला पुजायाला पुजायाला
हो भुजंगाला पुजायाला पुजायाला

आज पुजू फणी त्याची
मागू कुंकवाला धनी
राख कुंकवाची लाज
आज हीच आस मनी
आज पुजू फणी त्याची
मागू कुंकवाला धनी
राख कुंकवाची लाज
आज हीच आस मनी
आज हीच आस मनी
नागपंचमीला गाणी
गाऊया चला
नागपंचमीला गाणी
गाऊया चला

भुजंगाला पुजायाला पुजायाला
भुजंगाला पुजायाला पुजायाला
चला गं सख्यांनो

वारूळाला वारूळाला
चला गं सख्यांनो
वारूळाला वारूळाला
भुजंगाला पुजायाला पुजायाला
भुजंगाला पुजायाला पुजायाला
भुजंगाला पुजायाला पुजायाला
भुजंगाला पुजायाला पुजायाला
भुजंगाला पुजायाला पुजायाला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*